Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal Impact Factor 5.98
ISSN No. 2456-1665

# महात्मा गांधी यांच्या अहिंसा विचाराचा चिकित्सक अभ्यास

**मठपती ऋषीकेश सुभाष**
बी.एस्सी, एम.ए. (राज्यशास्त्र - इग्नू)
यूजीसी नेट (UGC NET); पीएच.डी.
Mo. No. 9075393889

**गोषवरा**

गांधींच्या अहिंसेचा मुख्य उद्देश विरोधकाचा नाश करणे नसून अन्यायाचा प्रतिकार करून विरोधकाच्या विवेकात परिवर्तन घडवून आणणे हा होता. त्यामुळे त्यांच्या अहिंसेमध्ये साध्य आणि साधन यांचे नैतिक ऐक्य आढळते. तथापि, गांधींच्या अहिंसेच्या व्यवहार्यतेबाबत अनेक प्रश्न उपस्थित झाले आहेत. अत्यंत हिंसक शासनव्यवस्था, युद्ध, दहशतवाद, सामूहिक हिंसा आणि तातडीच्या आत्मसंरक्षणाच्या परिस्थितीत अहिंसा कितपत परिणामकारक ठरते, हा महत्त्वाचा चिकित्सक प्रश्न आहे. तसेच अहिंसक संघर्षासाठी आवश्यक असलेले आत्मशिस्त, संघटन आणि नैतिक बांधिलकी सर्व समाजघटकांमध्ये निर्माण करणे कितपत शक्य आहे, याचाही विचार आवश्यक आहे. महात्मा गांधी यांच्या राजकीय आणि सामाजिक विचारांमध्ये अहिंसेला अत्यंत मध्यवर्ती स्थान आहे. गांधींसाठी अहिंसा ही केवळ हिंसा न करण्याची नकारात्मक भूमिका नव्हती, तर सत्य, प्रेम, करुणा, आत्मसंयम, नैतिक धैर्य आणि मानवतेचा आदर यांवर आधारित सकारात्मक जीवनपद्धती होती. त्यांनी अहिंसेला वैयक्तिक आचरणापासून सामाजिक आणि राजकीय संघर्षापर्यंत विस्तार दिला. सत्याग्रह, असहकार, सविनय कायदेभंग आणि रचनात्मक कार्यक्रम या माध्यमांतून त्यांनी अहिंसेचा व्यावहारिक वापर केला. दक्षिण आफ्रिकेतील संघर्षापासून भारतीय स्वातंत्र्यलढ्यापर्यंत त्यांच्या अहिंसक संघर्षपद्धतीचा विकास झाला. या संशोधन पेपरमध्ये गांधींच्या अहिंसा विचाराची तात्त्विक पार्श्वभूमी, स्वरूप, सत्याग्रहाशी असलेला संबंध, राजकीय व सामाजिक उपयोग, मर्यादा आणि समकालीन उपयुक्तता यांचा चिकित्सक अभ्यास करण्यात आला आहे.

**कीवर्ड्स -** महात्मा गांधी, अहिंसा, सत्य, सत्याग्रह, सविनय कायदेभंग, नैतिकता, शांतता, सामाजिक परिवर्तन, स्वातंत्र्यलढा

**प्रस्तावना**

अहिसा हे सत्यान्वेषी सर्वश्रेष्ठ कर्तव्य ठरते. गांधीजी हिसेच्या साम्राज्यात ज्यांनी अहिंसेच्या सिध्दांताचा शोध लावला त्या ऋषींना ते न्युटनपेक्षाही अधिक थोर सशोधक व वेलिंग्टनपेक्षाही अधिक थोर परिश्रमी मानतात. शस्त्रे कशी चालवायची यांचे ज्ञान झाल्यानंतर ती कशी विफल ठरतात यांची जाणीव होते. हिसेने नव्हे तर अहिंसेने मुक्ती होईल असे त्यानी जगाला सांगितले. महात्मा गांधीने 'हरिजन' या अकांत अहिंसेचा अर्थ स्पष्ट केला आहे तो असा की, "प्रथ्वीच्या पाठीवरील कोणत्याही वस्तूमात्राला व प्राणिमात्राला विचाराने, शब्दाने वा कृत्याने संभवणारी दुखापत टाळणे म्हणजे अहिंसा होय." महात्मा गांधीना संतत्व व जागतिक किर्ती प्राप्त झाली ती त्याच्या सत्य व अहिंसेच्या तत्त्वज्ञानामुळे राजकीय विचाराचा आधार सत्य आहे तर अहिंसा हे साधण मानले. अहिंसा म्हणजे केवळ हिंसेचा अभाव असा अर्थ गांधीना मान्य नाही. मानवाने एखादी कृती करत असताना इतरांना कसल्यास प्रकारचा त्रास न देता आपले कार्य करणे म्हणजेच अहिंसा होय मानवाने आपल्या 'स्व' स्वतंत्र्यांचा संपूर्ण उपयोग आपल्या व्यवहारात करावा आपल्या स्वमुळे इतरांना त्रास होणार नाही याची काळजी घ्यावी म्हणजेच अहिंसा होय. रागाना प्रेमाने, शत्रुला मित्रत्वाने, अहंकाराला उपकाराने उत्तर देणे म्हणजेच अहिंसा होय महात्मा गांधीने अहिंसेचे तीन प्रकारात वर्णन केले आहे ते पुढील प्रमाणे मांडता येईल.

**संशोधनाची उद्दिष्टे**

प्रस्तुत अभ्यास विषय हाताळतांना खालील उद्दिष्टे निश्चित केली आहेत.

1. महात्मा गांधी यांच्या अहिंसा या तत्वा मागील उद्देश जाणून घेणे
2. समाजाच्या बांधणीत अहिंसा या तत्वाचा आशय जाणून घेणे.
3. समकालीन परिस्थितीमध्ये अहिंसा या तत्वाची भूमिका जाणूनघेणे.

**संशोधन समस्या**

समाजाचा सर्वांगीन विकास होण्यासाठी समाजात चिरकालीन शांतता असणे आवश्यक आहे. समाजात आपुलकी, जिव्हाळा, प्रेम, वात्सल्य हे अहिंसेचे मुल्य आहेत. समकालीन परिस्थितीमध्ये समाजात किती प्रमाणात अहिंसेतील मुल्याची जोपासना झाली आहे हा संशोधनाचा विषय आहे.

**संशोधन पद्धती**

या संशोधनासाठी **ऐतिहासिक, वर्णनात्मक आणि चिकित्सक-विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा** वापर करण्यात आला आहे. दुय्यम स्रोत म्हणून गांधीवादी विचारांवरील पुस्तके, संशोधनपर साहित्य आणि राजकीय तत्त्वज्ञानाशी संबंधित अभ्यासांचा उपयोग करण्यात आला आहे.

**अहिंसेची संकल्पना**

‘अहिंसा’ हा शब्द भारतीय तत्त्वज्ञानात प्राचीन काळापासून आढळतो. जैन, बौद्ध आणि हिंदू तत्त्वज्ञानाच्या विविध प्रवाहांमध्ये अहिंसेला महत्त्वाचे नैतिक स्थान प्राप्त झाले आहे. गांधींनी या पारंपरिक संकल्पनेला आधुनिक सामाजिक आणि राजकीय संदर्भ दिला. त्यांच्या दृष्टीने अहिंसा म्हणजे केवळ एखाद्याला शारीरिक इजा न करणे नव्हे.

**संशोधनाचे महत्व**

हा विषय निवडण्या मागची पार्श्वभूमी अशी आहे की, समकालीन परिस्थितीमध्ये जगाच्या 34 संपूर्ण पटलावर हिसेने थैमान घातलेले आहे. सामाजिक अपप्रवृत्ती मुळे जग विनाशाच्या वाटेवर उभे आहे अशा वेळी महात्मा गांधी यांच्या अहिंसा या तत्वामुळे जगाची या परिस्थितीमधुन सुटका होऊ शकते. भविष्याचा अचूक वेध घेऊन समाजात उद्भवणाऱ्या अपप्रवृत्तीच्या समस्यांवर अहिंसा या तत्वामुळे मात करता येते. समाजात शांतता प्रस्थापीत करण्यासाठी अहिंसा या मुल्याचे आदान-प्रदान होणे आवश्यक आहे.

**गांधींच्या अहिंसेची तात्त्विक पार्श्वभूमी**

गांधींच्या अहिंसा विचारावर भारतीय आणि पाश्चात्त्य अशा विविध विचारपरंपरांचा प्रभाव होता.

**जैन धर्माचा प्रभाव**

जैन धर्मामध्ये अहिंसेला सर्वोच्च नैतिक मूल्य मानले जाते. जीवमात्राला इजा न करण्याची भावना गांधींच्या विचारांवर प्रभाव टाकणारी होती.

**बौद्ध विचार**

करुणा, मैत्री आणि दुःखमुक्ती या बौद्ध मूल्यांचा गांधींच्या अहिंसेशी जवळचा संबंध दिसतो.

**भगवद्गीतेचा प्रभाव**

गांधींनी भगवद्गीतेचे नैतिक आणि आध्यात्मिक स्वरूपातून वाचन केले. कर्म, अनासक्ती आणि आत्मसंयम या संकल्पनांचा त्यांच्या विचारांवर परिणाम झाला.

**ख्रिस्ती विचार**

येशू ख्रिस्ताच्या प्रेम, क्षमा आणि शत्रूप्रती सद्भाव या नैतिक शिकवणींचा गांधींवर प्रभाव पडला.

**टॉलस्टॉयचा प्रभाव**

लिओ टॉलस्टॉय यांच्या अहिंसा, प्रेम आणि नैतिक प्रतिकाराच्या विचारांनी गांधींना प्रेरणा दिली. टॉलस्टॉय यांच्या *The Kingdom of God Is Within You* या ग्रंथाचा गांधींच्या विचारांवर प्रभाव होता.

**हेन्री डेव्हिड थोरो**

थोरो यांच्या सविनय कायदेभंगाच्या विचाराचा गांधींच्या सत्याग्रहाशी वैचारिक संबंध जोडला जातो.

**महात्मा गांधीच्या अहिंसा विचारांची चिकित्सा**

**विरपुरुषाची अहिसा**

नैतिक दृद्या अहिंसा अपरिहार्य आहे हे मनोमन पटल्याने शूराने अहिंसा स्वीकारलेली असते या अहिंसेस विरपुरुषाची अहिसा म्हणतात विरपुरुषांची अहिंसा म्हणजेच समाजाच्या भल्यासाठी आवश्यक आहे.

**दुर्बलांची अहिंसा**

समाजातील जे दुर्बल, अगतीक लोक असतात त्यांनी ही अहिंसा स्वीकारलेली असते. या अहिंसेत नैतिक धारणा, सत्य, साहस या मुल्यांचा अभाव असल्यामुळे ही अहिंसा प्रभावी ठरू शकत नाही.

**मित्र्या लोकांची अहिंसा**

गांधीच्या मते, पाणी आणि अग्नी ज्याप्रमाणे एकत्र राहू शकत नाहीत. त्याच प्रमाणे अहिसा व भित्रे लोक एकत्र राहू शकत नाहीत

**भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील अहिंसेचे प्रयोग**

गांधींच्या नेतृत्वाखाली खालील विविध आंदोलनांमध्ये अहिंसेचा प्रयोग झाला.

**चंपारण सत्याग्रह**

शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर आधारित हा गांधींच्या भारतातील सुरुवातीच्या महत्त्वाच्या आंदोलनांपैकी एक होता.

**अहमदाबाद मिल कामगार संघर्ष**

कामगारांच्या मागण्यांसाठी गांधींनी सत्याग्रहाचा वापर केला.

**खेडा सत्याग्रह**

शेतकऱ्यांच्या आर्थिक अडचणींच्या पार्श्वभूमीवर करमाफीच्या मागणीसाठी आंदोलन करण्यात आले.

**असहकार आंदोलन**

1920 मध्ये व्यापक असहकार चळवळीला सुरुवात झाली.

**मिठाचा सत्याग्रह**

1930 च्या दांडी मार्चने ब्रिटिश मिठाच्या कायद्याला अहिंसक पद्धतीने आव्हान दिले.

**भारत छोडो आंदोलन**

1942 मध्ये ब्रिटिश सत्तेविरुद्ध निर्णायक राजकीय संघर्ष उभा राहिला. या काळात अनेक ठिकाणी हिंसक घटना घडल्या, ही बाब गांधींच्या अहिंसक आदर्शासमोरील व्यवहार्य आव्हान दर्शवते.

**अहिंसा व समकालीन परिस्थिती**

महात्मा गांधी यांची अहिसा या तत्वावर नितांत श्रध्दा होती. जगात शांतता प्रस्थापीत करण्यासाठी अहिंसा आवश्यक आहे असे गांधीने स्पष्ट केले होते. चोरी-चोरा घटनेमुळे हिसक वळन घेतल्यामुळे गांधीनी आंदोलन मागे घेतले तेव्हाच जगाला महात्मा गांधीच्या अहिंसा या तत्वाने मोहिनी घातली होती. आज जगामध्ये अराजक परिस्थिती निर्माण झाली आहे. एका बाजुला दहशतवाद तर दुसऱ्या बाजुला अत्याधुनिक अण्वस्त्र व क्षेपणास्त्र

सज्जता यामुळे जग विनाशाच्या वाटेवर उभे आहे समाजामध्ये एकमेका बदलची आपुलकी, जिव्हाळा संपुष्ठात आल्यामुळे समाजातील एकोपा निर्माण करणारे मुल्य लोप पावत चालेली आहेत. विकशीत राष्ट्रानी अण्वस्त्राच्या माध्यमातून जगात अशांतता प्रस्थापीत केली आहे शस्त्रास्त्र स्पर्धा यामुळे जगातएकमेका विषयी संशयाचे वातावरण तयार झाले यातून स्वतःचे सरक्षण करण्यासाठी अण्वस्त्र व क्षेपणशास्त्राची घोडदौडीला सुरूवात झाली समाजातील असलेल्या समस्या सोडवण्यासाठी पैसा खर्च करण्यापेक्षा दुसऱ्याराष्ट्राच्या भितीपोटी संरक्षणावर मोठ्या प्रमाणात खर्च केला जात आहे. यामुळे 21 व्या माहिती तंत्रज्ञानाच्या गतिमान युगात मानवाच्या पायाभूत सोयी सुविधा पुरवण्यात शासन अपयशी ठरत आहे.

जागतिक पाटलावर दहशतवाद व आतंकवादाने हाहाकार माजवला आहे जगामध्ये युध्दात जेवढी लोकसंख्या युध्दात मारली गेली आहे त्यापेक्षा अधिक लोकसंख्या आतकवाद व दहशतवादाने बळी घेतली आहे 1993 मुंबई बॉम्बस्फोट, संसदेवरील बॉम्बस्फोट, 2006 मुंबई बॉम्बस्फोट, जर्मन बेकरी बॉम्बस्फोट, मालेगाव बॉम्बस्फोट, इत्यादी बॉम्बस्फोटामध्ये हाजारो लोक मृत्यू मुखी पडली तर हजारो लोक यात जन्माचे अपगतत्व आले आहे जागतिक वर्ल्ड ट्रेड सेंटर व पेटॅगान हे लष्कराचे कार्यालय उडवून हजारो नागरिकांचा बळी घेतला पाकिस्तान मधील सध्याच्या पेशावर मधील 150 विद्यार्थ्यांचे हत्याकाड अशा किती घटना दिवसा गणित घडत आहेत जगाची सामाजिक घडी विस्कटलेली आहे.

समारोप व निष्कर्ष -

१. जगातील सामाजिक विस्कटलेल्या घडीला पूर्व पदावर आणण्यासाठी महात्मागांधीची अहिंसा राम बाण उपाय आहे.
२. स्वार्थी पणामुळे मानवाच्या आतील पशु जागा झाला आहे त्यामुळे सामाजिक अपप्रवृत्ती विषयक कार्य करत आहे. अशा प्रवृत्तीचे अहिसेच्या माध्यमातून मन परिवर्तन करणे शक्य आहे
३. समाजातील एकसंघता टिकवून ठेवणे अहिसेमुळे शक्य आहे
४. मानवाला जगात शांतता प्रस्थापीत करावयाचे अशेल तर अहिसे शिवाय पर्याय नाही हे

**संदर्भ सूची :-**

1. विष्णु भगवान, भा.रा.विचार, प्रकाशक आत्माराम एण्ड संस दिल्ली
2. श. गो. देवगांवकर, राजकीय विचारवंत, साईनाथ प्रकाशन नागपूर
3. साकेत बाबा भांड, माझ्या स्वप्नातील भारत, साकेत प्रकाशन औरंगाबाद
4. महादेव गव्हाणे, निकीता प्रकाशन लातूर,
5. अशोक कुमार, राजनीती विज्ञान, उपकार प्रकाशन आगरा,
6. बी. एल. फडिया, राजनीती विज्ञान, प्रकाशन प्रतियोगिता साहित्य सीरीज
7. Heise, L. L. *What Works to Prevent Partner Violence? An Evidence Overview*.
8. Jewkes, R. "Intimate Partner Violence: Causes and Prevention." *The Lancet*.
9. United Nations. *Declaration on the Elimination of Violence against Women*, 1993.
10. United Nations. *Convention on the Elimination of All Forms of Discrimination against Women (CEDAW)*.